# १०० दिवसांची कार्यालयीन सुधारणांची विशेष मोहिम

## सादरीकरण

## उद्योग सह संचालक

## विभागीय कार्यालय, पुणे

# १) संकेतस्थळ : MSME Samadhan

Ministry of Micro Small and Medium Enterprises
(Government of India)
MSME *SAMADHAAN*- Delayed Payment Monitoring System

MINISTRY OF MICRO, SMALL & MEDIUM ENTERPRISES
GOVERNMENT OF INDIA

स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर

English | Case Filing for Entrepreneur/MSE Units | Check Case Status | Factsheets | Officer Login

**ENTREPRENEUR CASE STATUS**

* **Please Select the Type of MSME Registration**

○ Udyog Aadhaar Number ○ Udyam Registration Number

**सूक्ष्म व लघू उपक्रम समाधान पोर्टल -** https://samadhaan.msme.gov.in या संकेतस्थळावरुन सूक्ष्म व लघु उपक्रमांचे थकीत रक्कम वसूली बाबतचे दावे ऑनलाईन दाखल करण्यात येतात. त्यावर सूक्ष्म व लघु उपक्रम सुकरता परिषदेकडून सर्व आकडेवारी अद्ययावत करण्यात येते.

**Instructions for user login**

1. Please follow the process given below
   1. Enter valid User Id.
   2. OR Enter valid Case No.
   3. Enter valid verification code as given in captcha image.
   4. Verification code is not case sensative.
   5. Click on Login button
2. Once you login with valid credential you will be redirected to your Dashboard where multiple action can be done.

**MSME SAMADHAAN- Delayed Payments to Micro and Small Enterprises under Micro, Small and Medium Enterprise Development (MSMED) Act, 2006**

| | | | |
|---|---|---|---|
| Draft Rules for MSEFC | State/UT Notified MSEFC Rules | MPR Format | Important Cases |

**Related Provision**

The Micro, Small and Medium Enterprise Development (MSMED) Act, 2006 contains provisions of Delayed Payment to Micro and Small Enterprise (MSEs). (Section 15- 24). State Governments to establish Micro and Small Enterprise Facilitation Council (MSEFC) for settlement of disputes on getting references/filing on Delayed payments. (Section 20 and 21)

**Nature of assistance**

MSEFC of the State after examining the case filed by MSE unit will issue directions to the buyer unit for payment of due amount along with interest as per the provisions under the MSMED Act 2006.


**Who can apply**

Any Micro or small enterprise having valid Udyam Registration can apply.

**Salient Features**


The buyer is liable to pay compound interest with the monthly rests to the supplier on the amount at the three times of the bank rate notified by RBI in case he does not make

# १) संकेतस्थळ : CMEGP





**मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम** - https://maha-cmegp.gov.in या संकेतस्थळावरुन संबंधित सुशिक्षित बेरोजगार युवक-युवतींना रु.५० लाख पर्यंत उत्पादन उपक्रम व रु. २० लाखा पर्यंतचे सेवा उपक्रमांकरीता ऑनलाईन कर्ज प्रकरण अपलोड करण्याची सुविधा उपलब्ध आहे.


# उद्योग विभागाच्या सर्व धोरण व योजनांचे एकत्रीकरण



**माहितीचे अद्ययावतीकरण (Updated Information)** – उद्योजक व नवगुंतवणूकदारांना विभागाच्या सर्व योजनांची माहिती आणि विविध परवाने मिळविणेसाठी विभागाने Single window system for investor facilitation (MAITRI 2.0) Portal https://maitri.maharashtra.gov.in दि. ४ फेब्रुवारी २०२५ रोजी मा.मुख्यमंत्री महोदयांच्या शुभ हस्ते कार्यान्वित करण्यात आले आहे.



**<u>माहिती अधिकार अधिनियमांतर्गत माहितीचे स्वयंप्रकटीकरण</u>** (Proactive disclosure under RTI Act) – माहिती अधिकार अधिनियम-२००५ अंतर्गत प्राप्त अर्ज हे विहीत मुदतीमध्ये निकाली काढण्यात येतात.तसेच माहिती स्वयंप्रकटीकरण व अद्ययावत माहिती उद्योग संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. त्यानुसार निकाली काढण्याकरीताचा विहीत कालावधी, प्रथम, व्दितीय तथा अंतिम अपील प्राधिकाऱ्यांचे नांव व पत्ते प्रदर्शित करण्यात आले आहे.




**माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत जनमाहिती अधिकारी यांचा तपशील**

कार्यालयाचे नांव : उद्योग सहसंचालक, विभागीय कार्यालय, पुणे
कार्यालयाचा पत्ता : कृषि महाविद्यालय आवार, शिवाजीनगर, पुणे–४११००५

दूरध्वनी क्रमांक : ०२०–२५५ ३७७२९/२५५ ३७३६९ ईमेल : diroune@maharashtra.gov.in

| अ.क्र. | तपशील | अधिकाऱ्याचे पद | विषय |
| --- | --- | --- | --- |
| १. | सहाय्यक जनमाहिती अधिकारी | उद्योग अधिकारी (तांत्रिक) | विभागीय कार्यालय, पुणे कार्यालयातील सर्व शाखा व विषय |
| २. | जनमाहिती अधिकारी | उद्योग उप संचालक (तांत्रिक) | विभागीय कार्यालय, पुणे यांच्या कार्यक्षेत्रात येणारे सर्व विषय. |
| ३. | प्रथम अपिलीय अधिकारी | उद्योग सहसंचालक, विभागीय कार्यालय, पुणे | विभागीय कार्यालय, पुणे यांच्या कार्यक्षेत्रात येणारे सर्व विषय. |

**लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत सेवा अधिसूचित करुन ऑनलाईन प्रसिध्द करणे**. — उद्योग संचालनालय, मुंबई यांच्या वतीने महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम-२०१५ अंतर्गत एकूण ५ सेवा ह्या सदर अधिनियमा अंतर्गत अधिसूचित. त्या बाबतचे सूचना फलक कार्यालयाच्या दर्शनी भागामध्ये प्रदर्शित करण्यात आलेले आहे. त्यानुसार उद्योग संचालनालया अंतर्गत देण्यात येणाऱ्या सेवा, त्यानुसार निकाली काढण्याकरीताचा विहीत कालावधी, प्रथम, व्दितीय, तृतीय तथा अंतिम अपील प्राधिकाऱ्यांचे नांव व पत्ते प्रदर्शित करण्यात आले आहे. सदर बाबत लोकसेवा हक्क आयुक्त यांचे कार्यालयामार्फत ह्या कार्यालयाचे सेवांसदर्भात तपासणी करण्यात आलेली असून तसे प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे.



सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम
आपली सेवा आमचे कर्तव्य

## सूचना फलक

(महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५)

(महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ मधील तरतूदींनुसार अधिसूचित केलेल्या सेवांबाबत तपशिल)

कार्यालयाचे नांव : उद्योग सह संचालक, पुणे विभाग, पुणे

विभाग : उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई

| अ.क | अधिसूचित सेवेचा तपशिल | लोकसेवा पुरविण्यासाठी विहीत केलेली काल मर्यादा | लोकसेवा पुरविण्यासाठी निर्धारित शुल्क | पदनिर्देशित प्रथम अधिकारी | प्रथम अपिलीय प्राधिकारी | व्दितीय अपिलीय प्राधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ | ०६ | ०७ |
| ०१ | सामूहिक प्रोत्साहन योजना- २०१३अंतर्गत मुद्रांक शुल्क माफीचे प्रमाणपत्र | ०७ दिवस | --- | उद्योग सह संचालक, पुणे विभाग | अतिरिक्त उद्योग संचालक, मुंबई | विकास आयुक्त (उद्योग) मुंबई |
| ०२ | सामूहिक प्रोत्साहन योजना- २०१३ अंतर्गत पात्रता प्रमाणपत्र अदा करणे | ३० दिवस | --- | उद्योग सह संचालक, पुणे विभाग | अतिरिक्त उद्योग संचालक, मुंबई | विकास आयुक्त (उद्योग) मुंबई |
| ०३ | सामूहिक प्रोत्साहन योजना- २०१३ अंतर्गत औद्योगिक प्रोत्साहन अनुदाना[illegible]या दाव्यांची मंजुरी | १५ दिवस | --- | उद्योग सह संचालक, पुणे विभाग | अतिरिक्त उद्योग संचालक, मुंबई | विकास आयुक्त (उद्योग) मुंबई |
| ०४ | खाजगी माहिती तंत्रज्ञान घटकांना नोंदणी प्रमाणपत्र देणे | ०७ दिवस | --- | उद्योग सह संचालक, पुणे विभाग | अतिरिक्त उद्योग संचालक, मुंबई | विकास आयुक्त (उद्योग) मुंबई |
| ०५ | खाजगी जैव तंत्रज्ञान घटकांना नोंदणी प्रमाणपत्र देणे | ०७ दिवस | --- | उद्योग सह संचालक, पुणे विभाग | अतिरिक्त उद्योग संचालक, मुंबई | विकास आयुक्त (उद्योग) मुंबई |

प्रथम अपिलीय प्राधिकारी मा. अतिरिक्त उद्योग संचालक, उद्योग संचालनालय, नवीन प्रशासन भवन, २ रा मजला, मुंबई-४०० ०३२. ई-मेल: diadi[at]maharashtra[dot]gov[dot]in

व्दितीय अपिलीय प्राधिकारी मा. विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, नवीन प्रशासन भवन, २ रा मजला, मुंबई-४०० ०३२. ई मेल: didci[at]maharashtra[dot]gov[dot]in

तृतिय व अंतिम अपिल, राज्य सेवा हक्क आयुक्त, पुणे महसूल विभाग, पुणे ३रा मजला, घोले रोड- शिवाजीनगर क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे- ४११००५. ई मेल: crtspune[at]maharashtra[dot]gov[dot]in यांचेकडे करता येईल

website : aaplesarkar.mahaonline.gov.in

उद्योग सह संचालक पुणे विभाग, पुणे,

# २.सुकर जीवनमान (Ease of Living)

- **(अ) मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम :** मा. विभागीय आयुक्त, पुणे विभाग यांच्या पातळीवर विभागातील सर्व बँकाचे झोनल मॅनेजर्स यांचा आढावा विभागातील जिल्ह्यांशी व बँकांशी सातत्याने समन्वय / पाठपुराव्याअंती विभागाची १४१. ४० टक्के उद्दिष्ट पूर्ती.

| आर्थिक वर्ष | विभाग | उद्दिष्ट | शिफारस प्रकरणे | मंजूर प्रकरणे | उद्दिष्ट निहाय मंजूरीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| २०२४-२५ | पुणे | २६६९ | १६०५१ | ३७७४ | १४१.४० % |



**योजने अंतर्गत विभागाचे कार्याचे विश्लेषण:**

**•मंजूर मार्जिन मनी ची रक्कम रु.१६५.५४ कोटी (राज्यात सर्वात जास्त).**
**•मार्जिन मनी दावे सादर रक्कम रु.११८.५९ कोटी. (राज्याच्या रक्कमेच्या ३३.१८ %).**
**•विभागातील सातारा जिल्ह्याचे उद्दिष्टाच्या प्रमाणात मंजूरीचे प्रमाण १३६ % (राज्यात सर्वात प्रथम).**
**•विभागातील कोल्हापूर जिल्ह्याचे मंजूर प्रकरण संख्या व मार्जिन मनी मंजूरी रक्कम – राज्यात सर्वात जास्त.**

# औद्योगिक समूह विकास योजना:

- औद्योगिक समूह विकास योजना – सन २०२४-२५

| योजनेचे नांव | केंद्र/राज्य सरकार हिस्सा | सामाईक सुविधा केंद्र संख्या | अनुदान वितरीत रक्कम (रु. कोटी मध्ये) |
|---|---|---|---|
| MSI-CDP (राज्य शासन) | | ०६ | १२.८१ |
| MSE-CDP (केंद्र शासन) | राज्य शासनाचा हिस्सा | ०४ | ५.८३ |
| | केंद्र शासनाचा हिस्सा | ११ | ५६.४७ |
| | | | **७५.११** |

| योजनेचे नांव | मंजूर निदान उपयोगी अभ्यास अहवाल संख्या | सविस्तर प्रकल्प अहवाल संख्या |
|---|---|---|
| MSI-CDP (राज्य शासन) | ०८ | ०४ |
| MSE-CDP (केंद्र शासन) | ०० | १० |
| | **०८** | **१४** |

# २.सुकर जीवनमान (Ease of Living)

## ब) सूक्ष्म व लघू उपक्रम सुकरता परिषद



सूक्ष्म व लघू उपक्रम सुकरता परिषद, पुणे



औद्योगिक सुकरता परिषद, सुनावणी कक्ष

| आर्थिक वर्ष | विभाग | प्राप्त प्रकरणे | एकूण सुनावण्या | निकाली प्रकरणे |
|---|---|---|---|---|
| २०२४-२५ | पुणे | २१९८ | १०४ | १४४० |







अध्यक्ष, औद्योगिक सुकरता परिषद, पुणे विभाग यांना सन २०२४ चा MSEFC Excellence Award मा. वित्त राज्यमंत्री, भारत सरकार यांचे हस्ते नवी दिल्ली येथे प्रदान.



Council resolves 75% disputes among industries in Pune divn

Shashank.Didmishe
@timesofindia.com

Pune: A quasi-judicial council formed by the directorate of industries has resolved 4,849 cases pertaining to disputes between the Micro and Small Enterprise Facilitation Council (MSEFC) Pune division.

The department received a total of 6,210 cases up to March 2025, taking the disposal rate to 75%, Shailesh Rajput, joint director of industries of the Pune region & chairman of MSEFC, informed.

"In FY 2024-25, the industrial facilitation council, Pune Region received 2,198 cases in the Pune division. In 74 conciliation hearings and 30 arbitration hearings, MSEFC disposed of 1,440 petitions involving Rs 57 crore," Rajput said.

MSEFC, Pune region, received the 'MSEFC Excellence Award 2024' in New Delhi for their performance last year.

"In FY 2024-25, the industrial facilitation council, Pune Region, received 2,198 cases in the Pune division. MSEFC disposed of 1,440 petitions involving Rs57 crore
Shailesh Rajput | MSEFC CHAIRMAN

The dispute resolution mechanism is part of the online MSME Samadhan initiative started by the ministry of MSME, Govt of India and implemented by state govt. MSMEs can file cases against buyers where payments are delayed or not made.

MSEFC is formed by state govt under the chairmanship of the joint director of industries and is convened by the deputy director of industries, who also functions as a member secretary. Zonal officers of the Bank of Maharashtra and chairman of Chakan and Ranjangaon industry associations act as its members.

Pune, Sangli, Satara, Kolhapur and Solapur are under the jurisdiction of the council.

The council, once the case is before it, hears both the parties as well as carries out scrutiny of the proofs brought before it.

Defaulting buyers have to pay the outstanding amount to the suppliers at three times the bank rate prescribed by the Reserve Bank of India (RBI) as per section 18 (3) of the Delayed Payment Act.

# २. सुकर जीवनमान (Ease of Living)

| पूर्वी | सद्य:स्थिती |
|---|---|
| **मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम** - सदर योजने अंतर्गत विभागीय कार्यालयामार्फत या पूर्वी सर्व जिल्ह्यांशी निगडीत प्रगतीचा आढावा घेताना अडचणी येत होत्या. | **मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम** – CMEGP पोर्टल व्दारे आता सर्व संबंधित बँक, शाखा, जिल्हा निहाय आकडेवारी निदर्शनास येत असल्याने सर्व संबंधितांना थेट संपर्क करुन योजने अंतर्गतचे उद्दिष्ट पूर्तता करण्यास मदत झाली आहे. |
| **सूक्ष्म, लघु उपक्रम सुकरता परिषद** – सदर परिषदे मार्फत पूर्वी याचिका थेट स्विकारण्यात येत असल्याने त्यावर नियंत्रण ठेवणे शक्य होत नव्हते. | **सूक्ष्म, लघु उपक्रम सुकरता परिषद** – एम.एस.एम.ई समाधान पोर्टलव्दारे आता ऑनलाईन याचिका तसेच संबंधित आवश्यक दस्तऐवज अपलोड करण्याची सुविधा करण्यात आल्याने प्रकरणांची थेट पडताळणी होऊन प्राथमिक स्वरुपातच आपापसातील समेटाव्दारे निकाली काढण्यात आलेल्या याचिकांच्या संख्येमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. |

# ३. स्वच्छता (Cleanliness)

- **अभिलेख निंदणीकरण व वर्गीकरण** – कार्यालयाचे अभिलेखे अ, ब, क आणि ड श्रेणीमध्ये वर्गीकरण करण्यात आलेले असून कायमस्वरुपी अभिलेखे कपाटामध्ये जतन करुन ठेवण्यात आलेले आहेत व दर ३ महिन्यांनी अभिलेख्यांचे निंदणीकरण करण्यात येते.





## ३. स्वच्छता (Cleanliness)

- **मुदतबाह्य अभिलेखे नष्ट करणे** – वर्गीकरणा नुसार सर्व अभिलेखे "अ", "ब" वर्ग निहाय वर्गीकृत करण्यात येऊन कायम स्वरुपी जतन करावयाची अभिलेखे अभिलेख कक्षामध्ये घेण्यात आलेल्या नोंदी निहाय जतन करण्यात येतात. मुदतबाह्य अभिलेखे नष्ट करण्यात आली आहे.

- **जड वस्तु संग्रह नोंदवही अद्ययावतीकरण** – सदर नोंदवहीमध्ये वेळोवेळी कार्यालयाकडे प्राप्त जड वस्तु संग्रहांच्या नोंदी वेळोवेळी घेण्यात येतात.

- **जुन्या निरुपयोगी जड वस्तूंची विल्हेवाट** – जुन्या निरुपयोगी वस्तूंचे निर्लेखन विहीत कार्यपध्दतीचे अवलंब करुन जडवस्तु संग्रह नोंदवहीमध्ये घेण्यात येते.

- **जुन्या वाहनांचे निर्लेखन** – या कार्यालयाकडील जुने दोन्ही वाहने निर्लेखीत करण्यात आलेली आहेत.

## ४. तक्रार निवारण (Grievance Redressal)

- **<u>आपले सरकार पोर्टलवरील तक्रारींचे निराकरण</u>** (दि. १ एप्रिल, २०२५ पूर्वीच्या तक्रारी निरंक करणे) – आपले सरकार पोर्टलवरील तक्रारींचे निराकरण तात्काळ करण्यात आले आहे. सद्य:स्थितीत पोर्टलवरील प्रलंबित अर्जांची संख्या निरंक आहे.
- **<u>पी.जी. पोर्टल वरील तक्रारींचे निराकरण</u>** (दि. १ जानेवारी, २०२५ पूर्वीच्या तक्रारी निरंक करणे) – पी. जी. पोर्टलवरील तक्रारींचे निराकरण तात्काळ करण्यात येते.
- **लोकशाही दिनाचे आयोजन व तक्रारीचे निराकरण** : लोकशाही दिनाच्या तक्रारी निरंक आहेत.
- **<u>अभ्यागत भेटीचे नियोजन व भेटीच्या वेळांबाबत प्रसिध्दी</u>** – सदरहू वेळापत्रका नुसार अभ्यागतांना भेटीची वेळ दु. ३.०० ते ५.०० अशी असून त्याचे फलक कक्षाच्या दर्शनी भागात प्रदर्शित करण्यात आली आहे.



# ५. कार्यालयीन सोई सुविधा

कायमस्वरुपी स्वच्छ पिण्याचे पाण्याची व्यवस्था

कर्मचारी, महिला कर्मचारी व अभ्यागत यांचेसाठी स्वच्छ प्रसाधनगृहाची व्यवस्था






## ५. कार्यालयीन सोई सुविधा

| अभ्यागतांसाठी सुसज्ज प्रतिक्षालय व्यवस्था | कार्यालयाचे सौंदर्यीकरण |
| --- | --- |





# ५. कार्यालयीन सोई सुविधा

## नामफलक व दिशादर्शक फलक





## ६. क्षेत्रीय कार्यालयांना भेटी (Visit to Field / District offices)

- आठवड्यातून किमान २ दिवस क्षेत्रीय कार्यालयांना भेटी देऊन पाहणी करणे – क्षेत्रीय कार्यालयांना आठवड्यातून किमान दोन वेळा भेटी देण्यात येतात.
- जिल्ह्याच्या ठिकाणी जिल्हा स्तरावरील कार्यालयांचा सर्व योजनांचा आढावा घेणे. स्वयं रोजगार योजनेत स्थानिक बँकांचा प्रगती आढावा घेणे. औद्योगिक समूह प्रकल्पांना भेटी. जिल्ह्यातील औद्योगिक संघटनांशी बैठक आयोजित करुन इतर शासकीय कार्यालयांशी समन्वय साधणे व स्थानिक पातळीवरील विषय यांचे निराकरण करणे. इत्यादी स्वरुपाची नियमित कार्यपध्दती आवलंबण्यात येते.

# ६. क्षेत्रीय कार्यालयांना भेटी

## केंद्र आणि राज्य शासनाच्या महत्वाच्या कार्यक्रम / प्रकल्पांना भेटी देऊन अंमलबजावणी व पर्यवेक्षण करणे

इंडो अमेरीकन चेंबर ऑफ कॉमर्स – सेमी कंडक्टर कॉन्फरन्स




मेगा एम.एस.एम.ई कॅम्प, यु.बी.आय







ॲटोमोटिव्ह सप्लाय चेन परिषद – CII

बेदाणे क्लस्टर, जत्त, सांगली



# ७. ई-ऑफीस प्रणाली (E-Office system)

- प्रशासकीय कामकाजात १ एप्रिल २०२५ पासून ई-ऑफीस प्रणालीचा वापर करणे – या कार्यालयाकडून ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात योजना राबविण्यात येतात. मुख्यत्वेकरुन सामुहिक प्रोत्साहन योजना आणि औद्योगिक सुकरता परिषदेकील प्रकरणे ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येऊन निकाली काढण्यात येतात.
- ई-ऑफीस प्रणालीत ४ किंवा त्यापेक्षा कमी स्तरावर मान्यता घेऊन प्रकरणांचा निपटारा करणे – योजनांची अंमलबजावणी करतांना ३ स्तरांपेक्षा जास्त स्तर नसल्याने विहीत कालावधीत प्रकरणे / नस्त्या निकाली काढण्यात येतात.

# ८ अ. आर्थिक व औद्योगिक गुंतवणूकीस प्रोत्साहन (Investment Summit)



गुंतवणूक परिषद, पुणे


गुंतवणूक परिषद, कोल्हापूर



गुंतवणूक परिषद, सोलापूर


गुंतवणूक परिषद, सांगली

| विभाग | सामंजस्य करार संख्या | संभाव्य गुंतवणूक (रु.कोटीत) | संभाव्य रोजगार निर्मिती |
|---|---|---|---|
| पुणे | ६७५ | २२००७.१४ | ७७३०८ |


गुंतवणूक परिषद, सातारा

# ८ आ. व्यापारी कामगार संघटनांच्या अडचणी सोडविणे
# ८ इ. गुंतवणूकदार उद्योजकांसाठी कायदा व सुव्यवस्था प्रभावीपणे हाताळणे






दि.२६/०३/२०२५ रोजी मोठे उद्योग, औद्योगिक संघटना, औद्योगिक वसाहती यांचे प्रश्नांचे निराकरणासाठी मा. विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या सभेमध्ये उद्योग व्यवसायांच्या सुलभतेकरीता तात्काळ उचित निर्णय घेण्यात आले असून अशा प्रकारच्या बैठका दर २ महिन्यांनी घेण्याबाबत ठराव.

गुंतवणूकदार उद्योजकांसाठी कायदा व सुव्यवस्था प्रभावीपणे हाताळणे – मा. विभागीय आयुक्त, पुणे विभाग तथा पोलीस विभाग यांनी उद्योजकांसाठी कायदा व सुव्यवस्था प्रभावीपणे राबविण्यात येत असल्याचे सूचित केले असून तशा बाबी आढळल्यास त्यांचे तात्काळ निराकरण करण्यात येईल असे आश्वासित केले आहे



लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

## वाहतूक कोंडीपासून उद्योगांना दिलासा द्यावा

### विभागीय आयुक्तांचे निर्देश

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** पुणे शहरातील एकात्मिक वाहतूक आराखडा मंजुरीच्या टप्प्यात आहे. मंजुरीनंतर लवकरच कार्यवाहीला सुरुवात होईल. पुणे बाह्यवळण मार्गालाही गती देण्यात आली असून, येत्या दोन वर्षांत हा मार्ग पूर्ण होण्याच्या दृष्टीने कार्यवाही सुरू असल्याची माहिती विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार यांनी दिली. वाहतुकीच्या अनुषंगाने अल्पकालीन, दीर्घकालीन उपाययोजनांना लागणारा आवश्यक वेळ पाहता तत्काळ करण्यासारख्या उपाययोजना हाती घेऊन उद्योगांना वाहतूक कोंडीपासून दिलासा द्यावा, असे निर्देश त्यांनी दिले.

उद्योजकांच्या विविध प्रश्नांच्या सोडवणुकीबाबत जिल्ह्यातील विविध औद्योगिक संघटनांची बैठक मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड अॅग्रिकल्चरच्या सभागृहात झाली. पुणे महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले, कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पिंपरी चिंचवड शहराचे अतिरिक्त पोलीस आयुक्त वसंत परदेशी, पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, पुणे विभागाचे उद्योग सहसंचालक शैलेश राजपूत, जिल्हा उद्योग केंद्राच्या महाव्यवस्थापक अर्चना कोठारी, एमसीसीआयएचे महासंचालक प्रशांत गिरबने या वेळी उपस्थित होते.

डॉ. पुलकुंडवार म्हणाले, 'राज्यात अधिकाधिक गुंतवणूक आकर्षित करण्याच्या दृष्टीने उद्योगांना सहकार्य, सुविधा देण्यास प्राधान्य आहे. या बैठकीत उद्योजकांनी मांडलेल्या समस्या, अडचणी जाणून घेण्यासाठी दर दोन महिन्याला बैठक घेतली जात आहे. संबंधित विभागांनी पुढील बैठकीपूर्वी त्यावर कार्यवाही करणे आवश्यक आहे. उद्योगांच्या समस्या सोडविण्यासाठी विविध प्रशासकीय विभागांनी सामूहिक दृष्टिकोन ठेऊन एकत्रित प्रयत्न करावेत. राज्यात उद्योगस्नेही वातावरण निर्माण करण्याचे राज्य शासनाचे धोरण असून, जिल्ह्यामध्ये विविध क्षेत्रांतील उद्योग येण्यासाठी प्रशासनातर्फे प्रयत्न केले जातील.'

'टुलिंग उद्योग विखुरलेले असल्याने त्यांना सुविधा पुरविण्यात येत असलेल्या समस्या सोडविण्याच्या दृष्टिने जागा, अन्य सुविधा उपलब्ध करून त्यांचा समूह (क्लस्टर) विकसित करण्यासाठी, खासगी उद्योगांच्या समस्या सोडवण्यासाठीही प्रयत्न करण्यात येतील. पुणे-मुंबई हा देशातील सर्वांत मोठा औद्योगिक प्रदेश करण्याचा प्रशासनाचा प्रयत्न आहे. एमआयडीसीने एक खिडकीद्वारे संबंधित विभागांशी समन्वय साधून उद्योजकांच्या समस्या सोडवाव्यात,' अशा सूचना जिल्हाधिकारी डुडी यांनी दिल्या.

'पुण्यात कार्यरत असलेल्या राज्य शासनाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या कटिबद्धतेमुळे देशातील आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांकडून गुंतवणूक प्रवाह अधिक तीव्रतेने सुरू राहील. त्यामुळे नवीन रोजगार निर्मिती होण्यासह या भागाचा आर्थिक विकास सुलभ होईल. दर दोन महिन्यांनी होणारी बैठक उद्योग आणि शासन यांच्यातील संवादासाठी महत्त्वाची ठरेल. पुणे विभागात औद्योगिक वाढीस चालना देण्यासाठी एमसीसीआयए राज्य सरकार आणि पुणे जिल्हा प्रशासनाला पूर्ण सहकार्य करेल,' असे गिरबने यांनी नमूद केले.

### उपद्रव करणाऱ्यांवर कठोर कारवाई

'उद्योजकांना कोणत्याही घटकाकडून त्रास देण्याचा प्रयत्न होत असल्यास पोलिसांकडून उपद्रव देणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येत आहे,' असे पोलीस अधीक्षक पंकज देशमुख यांनी सांगितले.


## ९. अधिकारी कर्मचारी प्रशिक्षण, सेवा विषयक बाबी आणि कृत्रीम बुध्दीमत्ता तंत्रज्ञानाचा वापर (AI)

**नव्याने सेवेत प्रविष्ट अधिकारी / कर्मचारी यांना प्रशिक्षित करणे** –

या कार्यालयाकडे नव्याने रुजू झालेल्या सर्व उदयोग निरिक्षकांचा “कुंडल विकास, प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधनी (वने)” पलूस, जि.सांगली येथे दि.०१/०४/२०२५ ते १२/०४/२०२५ या कालावधीत पायाभूत प्रशिक्षण कार्यक्रम पूर्ण झाला आहे.

- **पदोन्नत्या व कर्मचाऱ्यांच्या तक्रारींचे निराकरण करणे** – पदोन्नती संदर्भात कार्यवाही सुरु आहे. – आश्वासित प्रगती योजनेच्या अनुषंगाने दि.२०/०३/२०२५ रोजी बैठक घेण्यात आली. सदर बैठकीमध्ये गट-क आणि गट-ड मधील पात्र कर्मचाऱ्यांची निवड करण्यात येउन आश्वासित प्रगती योजने अंतर्गतचे कार्यालयीन आदेश निर्गमित करण्यात आले. त्याच प्रमाणे निवृत्तीवेतन धारकांचे व इतर अनुषंगिक तक्रांरींवर नियमित कार्यवाही करण्यात येते.

# ९. अधिकारी कर्मचारी प्रशिक्षण, सेवा विषयक बाबी आणि कृत्रीम बुध्दीमत्ता तंत्रज्ञानाचा वापर (AI)





कृत्रीम बुध्दीमत्ता तंत्रज्ञान वापरण्यासाठी अधिकारी / कर्मचारी यांना प्रशिक्षण देणे – कार्यालयातील अधिकारी / कर्मचाऱ्यांना E&Y च्या प्रतिनिधी यांचेकडून कृत्रीम बुध्दीमत्ता तंत्रज्ञान वापरण्यासंदर्भात प्रशिक्षण देण्यात आले आहे.




कार्यालयातील कामकाज अचूक होण्यासाठी प्रत्यक्ष कृत्रीम बुध्दीमत्ता तंत्रज्ञानाचा वापर (AI) सुरु करणे – कार्यालयातील अधिकारी / कर्मचाऱ्यांना E&Y च्या प्रतिनिधी यांचेकडून कृत्रीम बुध्दीमत्ता तंत्रज्ञान वापरण्यासंदर्भात प्रशिक्षण दिल्या नंतर प्रत्यक्ष कृत्रीम बुध्दीमत्ता तंत्रज्ञानाचा वापराबाबत कार्यवाही सुरु करण्यात आली आहे

# १०. नाविन्यपूर्ण उपक्रम




**(अ) विभागीय स्तरावरील निर्यात माहिती केंद्र :** राज्य शासनाच्या निर्यात धोरणाच्या अनुषंगाने निर्याताभिमुख उद्योग घटकांना आवश्यक असणारी माहिती विभागीय निर्यात केंद्रामार्फत उपलब्ध करुन देण्यात येते

**(ब) महाराष्ट्र औद्योगिक, व्यापार आणि गुंतवणूक सुकरता परिषद** (MAITRI) चे विभाग स्तरावरील MAITRI कक्ष कार्यान्वित असून विभागातील उद्योजकांसाठी या माहिती केंद्रामार्फत उद्योगाविषयी संपर्क साधलेल्या सर्व उद्योजकांना / अभ्यागतांना अद्ययावत डिजीटल तंत्रज्ञानाच्या सहाय्याने माहिती पुरविण्यात येते

# १०. नाविन्यपूर्ण उपक्रम

## विभागीय निर्यात प्रचलन कक्ष

- पुणे विभागीय निर्यात प्रोत्साहन केंद्राच्या वतीने, जिल्हा गुंतवणूकदार शिखर परिषद (DIS) २०२५ दरम्यान सध्याच्या निर्यात परिस्थितीबद्दल माहिती देण्यात आली.
- जिल्हा गुंतवणूकदारांच्या शिखर परिषदेत निर्यातीशी संबंधित भागधारकांच्या प्रश्नांचे निराकरण वैयक्तिक चर्चेद्वारे करण्यात आले
- महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राव्दारे (MCED) आयोजित करण्यात आलेल्या निर्यात प्रशिक्षण बॅच मधील २५ सहभागींना निर्यातीशी संबंधित माहिती प्रदान करण्यात आली.
- विभागीय निर्यात प्रोत्साहन कक्षामार्फत इच्छुक निर्यातदारांशी वैयक्तिक चर्चा करण्यात आली.

## मैत्री व्हर्च्युअल सेंटर

- महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राव्दारे (MCED) आयोजित करण्यात आलेल्या उद्योजकता बॅचमधील २५ सहभागींसोबत मैत्री २.० ची माहिती शेअर करण्यात आली.
- मैत्री २.० आणि व्हर्च्युअल सेंटरद्वारे व्यवसाय करण्याच्या सुलभतेवर चर्चा करण्यासाठी उद्योजकांशी वैयक्तिक संवाद साधण्यात आला.
- व्हर्च्युअल सेंटरद्वारे उद्योजकांसाठी मैत्री २.० आणि चॅटबॉटची जागरूकता आणि प्रात्यक्षिक आयोजित करण्यात आले.

# धन्यवाद

